पुणे महानगरपालिका कर्मचाऱ्यांचे मुखपत्र

# कल्याणवार्ता

• वर्ष २ रे • अंक : २१ • जून २००९ • पृष्ठे ४

इंटरनेट आवृत्ती – www.punecorporation.org

## व्यक्तिमत्व विकास शिबीराचे आयोजन

केंद्रीय कामगार शिक्षण मंडळ, पुणे व पुणे महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २ ते २२ जून, २००९ अखेर २१ दिवसांचे पूर्णकालीक जुन्या



कसबा पेठ क्षेत्रीय कार्यालय इमारतीतील कामगार प्रशिक्षण हॉल येथे व्यक्तिमत्व विकास शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. शिबीरामध्ये विविध खात्यातील वर्ग २ ते ४ मधील २१ अधिकारी/सेवकास प्रवेश देण्यात आला होता.

दिनांक २ जून, २००९ रोजी मा. नंदकिशोर जगताप, सल्लागार (कामगार) यांच्या हस्ते शिबीराचे उद्घाटन करण्यात आले. उद्घाटनपर भाषणात श्री. जगताप यांनी सेवकांना मार्गदर्शन करताना वेळोवेळी आयोजित करण्यात येणाऱ्या प्रशिक्षण वर्गांचे महत्व विषद केले. केंद्रीय शिक्षण मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचे कौतुक केले.

शिबीरामध्ये खालील वक्त्यांची त्याच्या नावापुढे दर्शविण्यात आलेल्या विषयांवर व्याख्याने आयोजित करण्यात आली होती :

श्री. प्रशांत एडवी, शिक्षणाधिकारी – भारतीय कामगार चळवळ, भारतीय राज्यघटना, कार्यप्रेरणा, पंचवार्षिक योजना, वेळेचे व्यवस्थापन, औद्योगिक सुरक्षा, ग्राहक संरक्षण, श्री. एस.बी.रामटेके, शिक्षणाधिकारी – उत्पादकता, वेतन प्रदान अधिनियम, वेतनाचे प्रकार, डॉ.पी.पी.जोशी, विभागीय संचालक, केंद्रीय कामगार शिक्षण मंडळ, पुणे – व्यक्तिमत्व विकास, श्री. एस.आर.गोडबोले, शिक्षणाधिकारी – देशाचे आर्थिक धोरण, गैरहजेरी, सकारात्मक दृष्टिकोन, कायझेन प्रणाली, गुणवत्ता मंडळ, संघर्ष व्यवस्थापन, टोटल क्वालिटी मॅनेजमेंट, पाच एस्, ताणतणाव व्यवस्थापन, श्रीमती परमजित खोत, डॉकेटी फौंडेशन, पुणे – एच.आय.व्ही.एड्स, श्री. सी.एम.जगताप– कार्य संस्कृती, कामगार संघटनांची कर्तव्ये, संघकार्य व संघभावना, नेतृत्व, निर्मितीक्षमता, मानवी संबंध, सामाजिक व वाईट सवयी, भावनिक बुद्धिमत्ता, श्री. मुकुंद गोरे – जागतिक कामगार संघटना व जागतिक नाणेनिधी, श्री. नंदकिशोर जगताप, सल्लागार (कामगार) –औद्योगिक व कामगार कायदे.

महाराष्ट्र, मध्यप्रदेश व गुजरात या तिन राज्यांकरिता कार्यरत असलेले विभागीय केंद्रीय कामगार शिक्षण मंडळाचे संचालक श्री. एस.एस.डांगी व त्यांचे सहकारी यांनी दिनांक १८/६/२००९ रोजी शिबीरास अचानक भेट दिली व सदरचा उपक्रम परिणामकारकरित्या राबविल्याबद्दल पुणे महापालिका व केंद्रीय कामगार शिक्षण मंडळ, पुणे यांची प्रशंसा केली.

सहभागी सर्व शिबीरार्थींनी शिबीर अत्यंत उपयुक्त असल्याचे नमूद केले. श्रीमती तेजस्विनी राजेंद्र चव्हाण–काळे, ऑक्झिलरी नर्स, कमला नेहरु रुग्णालय यांची अत्यंत प्रभावी प्रतिक्रिया स्वतंत्र छापली आहे.

दिनांक २२/६/२००९ रोजी शिबीराचा समारोप समारंभ आयोजित करण्यात आला होता. समारंभास केंद्रीय कामगार शिक्षण मंडळाचे विभागीय संचालक डॉ.पी.पी.जोशी अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात SWOT Analysis ही संकल्पना समजावून सांगितली. समारोप समारंभात शिबीरार्थींनी मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. इसाक शेख यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री. प्रमोद सोनवणे यांनी केले.

## केंद्रीय सफाई कर्मचारी आयोगाचा पुणे दौरा

सफाई कर्मचारी व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्यांचे सामाजिक, आर्थिक, राहणीमान, काम, सेवा व शैक्षणिक स्थिती, इ.बाबत अभ्यास करणेसाठी मा.हर्षवर्धन वाल्मिकी, अध्यक्ष, राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोग, सामाजिक न्याय एवं अधिकारिता मंत्रालय, नवी दिल्ली हे दि. १२/६/०९ रोजी पुणे दौऱ्यावर आले होते.

पुणे दौऱ्याच्या पूर्वनियोजित कार्यक्रमानुसार मा. अध्यक्ष यांनी दि. १२/६/०९ रोजी नवीन सर्किट हाउस येथे बैठक आयोजित केली होती. या बैठकीस उप सचिव, मा. बी.बी.शर्मा व खाजगी सचिव मा. एस.के.सिन्हा उपस्थित होते.

महापालिकेतर्फे मा. महेश झगडे, महापालिका आयुक्त, मा. उमाकांत दांगट, अति. महा.आयुक्त (वि), मा. आर.आर.परदेशी, प्रभारी आरोग्य प्रमुख, मा. नंदकिशोर जगताप, सल्लागार (कामगार), मा. लक्ष्मण डामसे, उपायुक्त (गवनि), मा. सुरेश जगताप, उपायुक्त (घन कचरा व्यवस्थापन), इ.अधिकारी उपस्थित होते. पुणे शहरातील सफाई कर्मचाऱ्यांच्या विविध संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

बैठकीच्या सुरुवातीस मा. महापालिका आयुक्त यांनी मा. अध्यक्ष आणि उप सचिव यांचे पुष्पगुच्छ देवून स्वागत केले. तसेच, महानगरपालिकेतील सफाई कर्मचाऱ्यांच्या कामाची स्थिती, त्यांना देण्यात येणाऱ्या विविध सुविधा, सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक लाभ याबाबत डॉ. आर.आर.परदेशी यांनी माहिती दिली. या माहितीमध्ये सफाई कामातील कचरा हाताळणी व कचरा गोळा करणे या कामाचे यांत्रिकीकरण करण्यात आले असून, कर्मचाऱ्यांना सुरक्षा प्रावरणे देवून त्यांचा कचरा आणि सांडपाणी यांच्याशी येणारा संबंध अत्यल्प करण्यात आला आहे. तसेच, सफाई कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांना सेवेत व सेवानिवृत्तीनंतरही वैद्यकीय सोयी सुविधा पुरविण्यात येत असून, कर्मचाऱ्यांना गणवेष, रेनकोट, गमबुट, इत्यादी नियमितपणे देण्यात येत आहेत. याशिवाय कर्मचाऱ्यांची मानसिक आणि शारिरीक स्वास्थ्य राखण्यासाठी नियतकालिक आरोग्य तपासणी, कामगार प्रशिक्षण, व्यक्तिमत्व विकास, योग साधना असे विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. तसेच, महापालिका सेवेत असताना मृत कर्मचाऱ्यांच्या वारसास एकूण रु. ५०,०००/– अर्थसहाय्य देण्यात येते, इत्यादी कल्याणकारी योजनांची माहिती डॉ. आर.आर.परदेशी यांनी उपस्थितांना दिली.

मनपातील चतुर्थश्रेणीतील सेवकांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध करुन देणेकामी २०% जागा ज्यु.ग्रे.लेखनिक संवर्गामध्ये राखून ठेवल्या आहेत, वारस प्रकरणे प्रलंबितचे प्रमाण अत्यल्प आहे. सेवानिवृत्ती वेतन प्रकरणी पाक्षिक आढावा घेण्यात येतो. कर्मचाऱ्यांना सेवाजेष्ठतेनुसार महापालिका वसाहतीतील सदनिका देण्यात येत आहेत, इत्यादी योजना महानगरपालिकेतर्फे राबविण्यात येत असल्याचे आयोगाला स्पष्ट करण्यात आले. महानगरपालिकेतर्फे सफाई कर्मचाऱ्यांना दिले जाणारे आर्थिक सहाय्य आणि राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजना याबाबत मा. अध्यक्ष यांनी समाधान व्यक्त केले.

## संतगाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान स्पर्धेत धनकवडी क्षेत्रीय कार्यालयास पुरस्कार

महाराष्ट्र शासनाच्या स्वच्छता व पाणीपुरवठा विभागातर्फे संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियानांतर्गत दिला जाणारा वॉर्डस्तरीय प्रशासकीय पुरस्कार धनकवडी क्षेत्रीय कार्यालयास मिळाला आहे. तीन लाख रुपयांचा धनादेश, प्रमाणपत्र, पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरुप होते.



विभागीय आयुक्त मा. दिलीप बंड यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या बक्षिस वितरण समारंभ प्रसंगी पुणे, पिंपरी चिंचवड, कोल्हापूर, सोलापूर, सांगली महापालिका व नगरपरिषदांना मा. विभागीय आयुक्त यांचे हस्ते बक्षिसे देवून सन्मानित करण्यात आले.

मा. भिमराव तापकीर, अध्यक्ष, प्रभाग समिती, धनकवडी यांनी सदर पारितोषिक स्विकारले. तसेच, विशेष पुरस्कारांतर्गत हडपसर क्षेत्रीय कार्यालयास मिळालेले पारितोषिक मा. सुनिल बनकर, अध्यक्ष, प्रभाग समिती यांनी तर बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालयास मिळालेले विशेष पारितोषिक मा. अनिल जगताप, क्षेत्रीय अधिकारी व डॉ. अमृता इंगळे यांनी स्विकारले.

या प्रसंगी मा. संजय नांदे, मा. सुधाकर तेलंग, मा. उमेश माळी, मा. माधव देशपांडे, डॉ. केतकी घाडगे, डॉ. सूर्यकांत देवकर, डॉ. आर.एन.जोशी, डॉ. कल्पना बळीवंत, श्री. हेमंत मोरे, श्री. मधुकर घोलप, श्री. दत्तात्रय चव्हाण, श्री. सुनिल घोळवे, श्री. सुनिल राठोड, श्री. रविंद्र जगरवाल, श्री. प्रदीप चव्हाण, श्री. आनंद शेंडगे, श्री. राहुल सोरटे, श्री. दिनेश सोनवणे, श्री. लाखे, श्री. काथवटे, श्री. मंद्रुपकर तसेच अन्य अधिकारी उपस्थित होते. तसेच, विविध नगरपरिषदांचे पदाधिकारी, मुख्याधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रसंगी मार्गदर्शन करताना विभागीय आयुक्त मा. दिलीप बंड यांनी सांगितले की, सद्यस्थितीत नगरपालिका, महापालिका यांना कचरा व्यवस्थापन व पाणी समस्या हे दोन्ही प्रश्न भेडसावत आहेत. कचरा निर्मूलन करावयाच्या दृष्टीने पुणे महापालिकेच्या वतीने मोठ्या प्रमाणावर प्रयत्न करण्यात येत आहेत. कचरा समस्या निराकरण करावयाच्या दृष्टीने प्रशासन, लोकप्रतिनिधी, लोकसहभाग यांचे एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे.

गांडूळ खत प्रकल्प, ओला व सुका कचरा विभाजन व विल्हेवाट अशा परिणामकारक योजना एकत्रित राबविणे आवश्यक आहे. त्याचबरोबर पावसाचे पाणी साठविणे, पावसाच्या पाण्याचा पुनर्वापर, पाणलोट क्षेत्र, विहिर पुर्नभरण, सौर उर्जा अशा पर्यायांचा अवलंब करुन प्रसार, प्रचार व अंमलबजावणी परिणामकारक करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

या प्रसंगी विभागीय आयुक्त कार्यालयातील उपायुक्त प्रकाश पाटील यांनी प्रास्ताविकपर भाषणात संत गाडगेबाबा अभियानांतर्गत होत असलेल्या विविध यशस्वी उपक्रमांची माहिती दिली.

बक्षिसपात्र विजेत्या महापालिकेच्या वतीने पुणे महापालिकेतील सभासद व हडपसर क्षेत्रीय कार्यालय प्रभाग समितीचे अध्यक्ष मा.सुनिल बनकर, तसेच नगरपालिकांच्या वतीने श्री. सतीश कुलकर्णी, मुख्याधिकारी, सातारा नगरपरिषद, सासवड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी श्री. बेहेरे यांनी मनोगते व्यक्त केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन नगर प्रशासनातील तहसिलदार श्रीमती विजया पांगारकर यांनी केले.

## संपादकीय...

# अधिकार आणि जबाबदारी

प्रत्येक संस्थेमध्ये नियोजन प्रक्रियेचे विश्लेषण करताना प्रथम ध्येय निश्चित करावे लागते.त्या अनुषंगाने कार्यप्रणाली निर्माण केली जाते. संघटन हे प्रशासनाचे साधन आहे. याचा उपयोग पूर्वनिर्धारित लक्ष गाठण्यासाठी केला जातो. त्यानंतर श्रमविभागणी महत्वाची संकल्पना अत्यंत काळजीपूर्वक हाताळावी लागते. या संकल्पनेमधूनच केंद्रीकरण व विकेंद्रीकरणांचा उदय झाला आहे. परिणामकारक संघटनासाठी केवळ कामाची लहान गटात विभागणी करणे अभिप्रेत नसून, लहान गटांतील समन्वय  व पूर्वनियोजन ध्येय प्राप्त करण्यासाठी करावे लागते.यामध्ये लहान गटांना सुपूर्त करण्यात आलेल्या अधिकारांचा विचार प्रामुख्याने करावा लागतो.मोठ्या संस्थेत अधिकारांचे विकेंद्रीकरण अनिवार्य ठरते.

व्यवस्थापकाला असलेले अधिकार त्याच्या कनिष्ठ सहकाऱ्यांना देण्याच्या प्रक्रियेस अधिकार सुपूर्ती म्हणतात. अधिकार म्हणजे निर्णय घेवून कारवाई करणेचा हक्क. संस्थेसाठी हा अधिकार व्यवस्थापकाचा असतो. व्यवस्थापक याद्वारे सहकाऱ्याकडून कामे करवून घेतात. त्यामुळे, ती व्यवस्थापकीय कार्याची गुरुकिल्ली आहे. अधिकार, स्विकृती व योग्यता असे सिध्दांत सर्वमान्य आहेत. या तिन्ही सिध्दांतामधून महत्वाची बाब निदर्शनास येते. ती म्हणजे व्यवस्थापकाकडे असलेल्या अधिकारांपैकी मर्यादित अधिकार कनिष्ठ अधिकाऱ्यांना ध्येयपूर्तीसाठी देण्यात येतात, यास अधिकारसुपूर्ती म्हणतात. तथापि, कनिष्ठ अधिकाऱ्यांना आपले अधिकार सुपूर्त करण्यापूर्वी कनिष्ठांची योग्यता, स्विकृती, नियोजन, धोरण व कायद्याच्या मर्यादा, इ.बाबी विचारात घ्याव्या लागतात. तसेच, संस्थेचे अंतिम हित विचारात घेवून अग्रक्रमाने केलेल्या नियोजनाचा विचार करणे अनिवार्य आहे.

संघटनात्मक प्रक्रियेमध्ये अधिकारसूपूर्ती ही अत्यंत महत्वाची आहे. प्रभावी अंमलबजावणीसाठी त्याचा उपयोग होतो. असे केल्याने वरिष्ठांचा कार्यभार कमी होतो, कनिष्ठांना अधिकार वापरावयास मिळाल्याने त्यांची जबाबदारी वाढते व त्यांचा विकास होतो, संघटनेच्या कार्यप्रणालीमध्ये सातत्य राखण्यास मदत होते, तसेच, अधिकाराचे विकेंद्रीकरण केल्याने ध्येयपूर्ती किमान वेळेत करणे शक्य होते.कमाल कर्मचाऱ्यांचा उपयोग पर्याप्त क्षमतेपर्यंत केला जातो. असे लाभ अधिकार सुपूर्तीमुळे संस्थेस होतात. तथापि, अधिकार सुपूर्तीची प्रक्रिया अनेक कारणांसाठी वापरण्याऐवजी संस्थेच्या ध्येयपूर्तीसाठी वापरणे अनिवार्य ठरते. त्यामध्ये सुपूर्ती व स्विकृती करणारा यांचा सकारात्मक सहभाग अनिवार्य ठरतो. तथापि, अधिकार सुपूर्ती करताना कनिष्ठांची क्षमता, विश्वासार्हता, कार्यप्रणाली, एकूण विचारधारा, संस्थेप्रती असणारी निष्ठा व पूर्वानुभव विचारात घेवून मर्यादित अधिकारसुपूर्ती केल्याने आढळलेले दृश्य परिणाम या सर्वांचा एकत्रित विचार करुन केलेली अधिकार सुपूर्ती संघटनेचा पाया, सक्षम व मजबुत करणारी ठरते. मर्यादित अधिकार सुपूर्ती, विपरित परिणाम टाळण्यासाठी नैसर्गिकदृष्ट्या प्रभावी नियंत्रक ठरते. अन्यथा अवास्तव विकेंद्रीकरण करुन अधिकार सुपूर्ती केल्यास त्याचे विपरित परिणाम होता व ध्येयपूर्तीमध्ये अडचणी निर्माण होतात, ही वस्तुस्थिती डोळ्याआड करता येत नाही. अशा परिस्थितीत नैसर्गिक मर्यादांचे पालन करुन व संस्थेच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देवून मर्यादा विहित करुन सबळ अधिकार सुपूर्ती करणे निश्चितच परिणामकारक होते. परिणामी योग्य कामास योग्य अधिकारी/सेवक नेमून अंतिमत: उत्तम व परिणामकारक कार्य आणि ध्येयसिध्दता करुन घेता येते.

जबाबदारी म्हणजे कामाची जाणीव आणि उत्तरदायित्व म्हणजे व्यक्तिने जबाबदारी पार पाडण्याचे बंधन. म्हणजे जबाबदारी आणि उत्तरदायित्व या दोन्ही बाबी एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. अधिकार सुपूर्ती हा व्यवस्थापन प्रक्रियेचा एक अनिवार्य घटकआहे. तो स्विकारल्यास त्याचे बरेवाईट परिणाम अनिवार्य ठरतात. अधिकार सुपूर्ती म्हणजे हक्कवाटपाची प्रक्रिया असते. प्रथमत: सत्ता व त्या अनुषंगाने अधिकार केंद्रीभूत असतात. संस्थेचा विस्तार झाल्यास केंद्रीकरण दुर्बोध ठरते. त्यामुळे मर्यादित अधिकार सुपूर्ती झाल्यास ध्येयपूर्तीच्या अंमलबजावणीत गतिमानता येते. अधिकारसुपूर्ती म्हणजे विकेंद्रीकरणास सुरुवात. विकेंद्रीकरणात अधिकाराचे वाटप होते. विकेंद्रीकरणामुळे नियंत्रणाची सर्वोच्च शक्ती आणि परिणामांची सर्वोच्च जबाबदारी ही संस्थेमध्ये निम्न स्तरावर आणण्यात आल्याचे दिसत असले तरी, काही प्रसंगी विपरित परिणाम दिसल्यास त्याचा वेगळा विचार केला जातो.  केंद्रीकरणाच्या तत्वज्ञानाचे पुरस्कर्ते असा युक्तिवाद मांडतात की, प्रत्येक व्यवस्थापकाने नियोजन, संघटन, मार्गदर्शन, नियंत्रण आणि उद्युक्तीकरण याचा संपूर्ण अधिकार स्वत:कडे ठेवावा.  त्याने व्यवस्थापकीय प्रक्रियेवर पकड जराही सैल होवू देवू नये.  परंतु आधुनिक काळात केंद्रीकरणापेक्षाही विकेंद्रीकरणास अनन्य साधारण महत्व प्राप्त झाले आहे.  कारण संस्थेचा होणारा विस्तार, नागरिकांच्या वाढलेल्या अपेक्षा, अंमलबजावणीतील पारदर्शकता आणि कार्यपूर्तीसाठी विहित केलेली कालमर्यादा, इ. बाबी विचारात घेता अधिकाराचे मोठ्या प्रमाणावर विकेंद्रीकरण केल्यास व कनिष्ठ स्तरावर अधिकाधिक अधिकार प्रदान केल्यास कनिष्ठ स्तरावरील अधिकाऱ्यांच्या जबाबदारीमध्ये वाढ होवून त्यांची कार्यक्षमता वाढते.

याचाच एक भाग म्हणून घटनेच्या ७३ व ७४ व्या दुरुस्तीने महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये प्रभाग समित्या स्थापन करुन अधिकाराचे विकेंद्रीकरण केले आहे.  त्यामुळे दर्जेदार नागरी सुविधा त्वरीत मिळण्याच्या दृष्टीने प्रागतिक पाउल उचलले आहे. महानगरपालिकेमध्ये सद्यस्थितीत १४ प्रभाग समित्या क्षेत्रीय कार्यालयानुसार कार्यरत असून, प्रशासनानेसुध्दा क्षेत्रीय कार्यालयांना मोठ्या प्रमाणावर अधिकार प्रदान करुन अधिक सशक्त व सक्षम बनविण्यासाठी उपाययोजना केल्या आहेत.  ज्या प्रमाणामध्ये संस्थेचा विस्तार, अंदाजपत्रक, इत्यादीमध्ये वाढ होईल त्या प्रमाणात अधिकार सुपूर्ती करणे अनिवार्य ठरणार आहे.  कारण अधिकार आणि जबाबदारी हे दोन्ही घटक परस्परांवर अवलंबून असून, त्यांचा योग्य समन्वय साधला गेल्यास संस्थेच्या कार्यक्षमतेमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ होवू शकेल.  तथापि त्याचे विपरित परिणाम होणार नाही, याची दक्षता घेवून अंतिमत: नैसर्गिक मर्यादेतच अधिकार सुपूर्ती होणे अनिवार्य व नैसर्गिक होणार आहे. परिणामी शहरवासियांना दर्जेदार नागरी सुविधा वेळेवर देणे शक्य व शिस्तबध्द होणार आहे.

# परिचय कार्यक्षम अधिकारी/कर्मचाऱ्याचा

## श्री. दिलावर अकबर आवटी, आरोग्य निरीक्षक

सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील श्री. दिलावर अकबर आवटी यांनी प्राथमिक शिक्षण बोरगाव, बी.कॉम. पर्यंतचे शिक्षण शिवाजीनगर युनिव्हर्सिटी, इस्लामपुर तर एम.एस.डब्ल्यु.पुणे युनिव्हर्सिटीतून पूर्ण केले.

सन १९९० मध्ये श्री. आवटी पुणे महानगरपालिकेच्या उद्यान विभागात माळी या पदावर रुजू झाले.  नायडू हॉस्पिटलचे आवारात सुव्हेज ट्रिटमेंट प्लॅन्टमध्ये काम करीत असताना त्यांचा पुण्यातील विविध संस्थांशी संबंध आला व यातून प्रेरणा घेवूनच त्यांनी समाज कल्याण विभागाची पदव्युत्तर पदवी मिळविली.  या शुध्दिकरण केंद्रातील वरिष्ठ अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी त्या वेळचे सहाय्यक अभियंता यांना नायडू हॉस्पिटलमधील शुध्दिकरण केंद्राचे आवारात बागकामाचे नियोजन करुन दिले.    महापालिकेतील नागरवस्ती विकास योजना या विभागात समाजसेवक या पदावर त्यांची सन १९९६ या वर्षी नेमणूक झाली.

नागरवस्ती विकास योजना या विभागात मा. कळमकर, सह महापालिका आयुक्त यांचे नियंत्रणाखाली बोपोडी, भवानी पेठ, कसबा, हडपसर आणि बिबवेवाडी या विभागात समाजसेवक म्हणून त्यांनी काम केले.  या काळात समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत कामाचे निमित्ताने जाता आल्याचे ते आवर्जून सांगतात.  या विभागात काम करताना त्यांनी सर्वसामान्य नागरिकापर्यंत विविध योजनांची माहिती कशी पोचविता येईल, हे पाहिले.

याच काळात त्यांचा वाचनाचा व्यासंग वाढल्याने शिक्षण लेखन व तज्ञांशी त्यांचा संपर्क आला. त्यातूनच त्यांची वक्तृत्वकला उदयास आली आणि त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास होत गेला. लेखनाला ते आपली संपत्ती मानतात. पु.ल.देशपांडे, प्रा.वसंत कानेटकर, शंकर अभ्यंकर, व.पु.काळे, धर्माधिकारी, वाळिंबे हे त्यांचे आवडते लेखक आहेत. तसेच, ते प्राचार्य शिवाजीराव भोसले, अभ्यंकर, धर्माधिकारी यांची व्याख्याने आवर्जुन ऐकतात.

पुणे साक्षरता अभियान या मोहिमेंतर्गत भवानी पेठेतील १९ वस्त्यांमधून चार हजार निरक्षर व्यक्तिंना साक्षर करण्यात मला जीवनातील सर्वात मोठा आनंद मिळाला, असे ते अभिमानाने सांगतात.  या कार्यामध्ये मा. कळमकर, सह महापालिका आयुक्त यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभल्याचे ते आवर्जुन उल्लेख करतात.  नागरवस्ती



विभागात बालवाड्या, बाल विकास केंद्रे, युवा विकास केंद्राची घडण करताना आपण स्वत: घडत होतो, याची त्यांना जाणीव आहे. पुढे शासनाची नेहरु रोजगार योजना, मागासवर्गीय कल्याण योजना, महिला बाल कल्याण योजना राबवत असताना सध्याची बचत गटाची चळवळ निर्माण करण्याची संधी त्यांना मिळाली.याच काळात सतत काम करत असताना विश्रांती मिळत नव्हती. परंतु कामात बदल म्हणजेच विश्रांती हे त्यांच्या वाचनात आल्याने व विविध प्रकारचे शिक्षण घेतल्याने त्यांनी आरोग्य विभागात सन २००३ मध्ये आरोग्य निरीक्षक या पदावर नेमणूक झाली. महापालिकेतील एक मोठा विभाग ज्या ठिकाणी सर्व स्थरातून नागरिक, सभासद तसेच महापालिका अधिकारी यांचा संबंध येतो अशा विभागात काम करण्याची त्यांना संधी मिळाली.  या संधीचा फायदा घेवून नागरिकांच्या तक्रारी सोडविण्याचे तंत्र अवगत करता आले व प्रशासनाचा अभ्यासही करता आला, असे त्यांना वाटते.

श्री. आवटी एल.एस.जी.डी., जी.डी.सी अ‍ॅण्ड ए., एल.जी.एस. व एस.आय. परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत.  जे आपण करतो तेच आपण लिहिले पाहिजे या न्यायाने सन १९९० ते १९९५ या काळात बागकाम, उदास धुंगरांच्या व्यथा तसेच, सन १९९६ ते २००२ या काळात बचत व स्वयंसहाय्यता गट या विषयांवर त्यांनी लिखान केले आहे.  सध्या आरोग्य निरीक्षक या विषयावर आपले अनुभव लिहित असल्याचे त्यांनी सांगितले.  पुणे साक्षरता या अभियान काळात त्यांनी माजी सनदी अधिकारी डॉ. गोविंद गारे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे शहरी झोपडपट्टीतील साक्षरता आणि साक्षरता मोहिमचा अभ्यास शोध आणि बोध या विषयावर यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे प्रबंध लिहिला आहे.

बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालयात आरोग्य विभागात काम करीत असताना मे.सुप्रिम कोर्टाचे आदेश २००० अन्वये सन २००४ ते ०७ मध्ये कचरा विभाजन करण्यात येथील सोसायट्यांमध्ये यंत्रणा राबविण्यात त्यांनी विशेष कामगिरी केलेली होती.  सन २००५-०६ या काळात बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालयास संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियानामध्ये द्वितीय पुरस्कार मिळवून देण्यामध्ये तेथील वरिष्ठ अधिकाऱ्याबरोबर प्रभाग क्र. १७ कोंढवा या प्रभागातील आरोग्य विभागातील सेवकांनी परिश्रम घेतले होते. याची दखल घेत इंटेलिजंट पुणे या साप्ताहिकाने २१ ते २७ जून, २००७ या कालावधीमध्ये आय वॉंट टु सॅग्रीगेट गार्बेज या नावाने एक लेखही प्रसिध्द केलेला आहे.

पुणे महानगरपालिकेचे वरंम जनहित ध्येयम हे ब्रिद सार्थ करणेसाठी आपल्या नियंत्रणाखालील सेवकांनी जास्तीत जास्त परिश्रम घेतले पाहिजेत, असे श्री. आवटी यांना वाटते.  तसेच नागरिकांना समाधान मिळेल असे काम केले पाहिजे व दिलेले काम नियोजनबध्द पध्दतीने व वेळेत पूर्ण करणे अनिवार्य असल्याचे ते सांगतात.

# अंधश्रध्दा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्याचे मनोगत

अंधश्रध्दा निर्मूलन समितीची १९८९ मध्ये पुण्यात स्थापना झाली. समितीच्या स्थापनेपासून मी काम करीत आहे. काम करताना काही चांगले वाईट अनुभव येत असतात.अंधश्रध्दा ह्या  अज्ञानातून निर्माण झाल्या आहेत. पाउस का पडतो, रात्र का होते, मृत्यू का येतो असे अनेक प्रश्न आदीमानवापुढे होते. कालानुरुप प्राप्त ज्ञान व अनुभवानुसार व स्वत:च्या बुध्दी कौशल्याप्रमाणे या घटनांचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केला. अशा घटना घडण्यामागे काही दैवी/असूरी शक्ती असावी असे अनुमान काढले. हेच यातून अंधश्रध्देचे उगमस्थान.

वैज्ञानिक संशोधनाद्वारे झालेली क्रांती होईपर्यंत अशा कल्पना अंधश्रध्दा आहेत हे सिध्द झाले नव्हते. उलटपक्षी कालानुरुप त्यात वाढ होत गेली. वैज्ञानिक संशोधनानंतर निसर्गनियमानुसार वरील घटनांसह अन्य घटना व परिस्थितीचा अभ्यास झाला. त्याद्वारे घटना घडण्यामागील कार्यकारण भाव जगापुढे आला. परिणामी जगात कोणतीही दैवी/अघोरी शक्ती कार्यरत नसते हे शास्त्रज्ञांनी सप्रमाण सिध्द केले.

ही चळवळ समाजाला अंधश्रध्दांच्या विळख्यातून बाहेर काढण्याची, भोंदूबुवा, तथाकथीत बाबा महाराज यांचेकडून होणारे समाजाचे शोषण थांबविण्याकरिता सुरु झाली आहे. ही चळवळ कोणत्याही धर्मविरोधी नाही. फक्त धर्माच्या नावाखाली रुढ करण्यात आलेल्या अनिष्ठ प्रथा, त्याद्वारे होणारे शोषण व घेतले जाणारे बळी हे थांबविणेसाठी आहे.

समितीचे कार्यक्रम शहरी/ग्रामीण भागातून होतात. बहुसंख्य कार्यक्रम शाळा, कॉलेजमध्ये घेतले जातात. चमत्कारांच्या प्रात्यक्षिकांसह प्रबोधन असल्यास कार्यक्रम लोकांना अधिक आवडतात. चमत्कारा मागील विज्ञान व हातचलाखी त्यांना प्रात्यक्षिकाद्वारे स्पष्ट केल्यास  उपस्थितांपैकी काही जणांनी आपण कसे आंधळेपणाने चुकीच्या रुढी, परंपरा पाळत होतो हे प्रांजळपणाने कबूल केले. यापुढे डोळसपणे वागणार असल्याचे सांगितले आहे. त्यापैकी काही जण आता माझ्याबरोबर समितीचे कार्यकर्ते म्हणून काम करीत आहेत.

अंधश्रध्देचे बळी पुरुषांपेक्षा स्त्रिया जास्त आहेत. कारण सर्व धर्मांनी स्त्रियांना दुय्यम स्थान दिलेले आहे. परिणामी स्त्रिया असहाय्य व अगतिक झाल्याने विमनस्कपणे आचरण करतात, उदा. अंगात देवी येणे. समितीच्या कार्यक्रमात स्त्रियांना सखोल प्रात्यक्षिकासह माहिती देवून त्यांचा आत्मविश्वास वाढविला जातो. त्याद्वारे अंधश्रध्दा दूर करण्याचा प्रयत्न केल्याने काही स्त्रिया स्वयंसिध्दा झाल्या. परिणामी अंगात येण्याचे प्रकार थांबले आहेत. त्या खंबीरपणे परिस्थितीला तोंड देवू लागल्या.

राषी भविष्य ही एक अंधश्रध्दा आहे हे जगभरच्या नोबेल पारितोषिक विजेत्या शास्त्रज्ञांनी एकत्र येवून जाहीर केले आहे. पुणे विद्यापीठाच्या संशोधन समितीचा या विषयावर अभ्यास झाला असून, ज्योतिष ही भ्रामक कल्पना असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. परिणामी काही ज्योतिषांनी समितीच्या भूमिकेला मान्यता दिली आहे.

असे उत्तम अनुभव आहेत.  काही वाईट अनुभव देखील आहेत. समिती धर्म बुडवायला निघाली आहे, अशी  टीका करुन तथाकथीत धर्मरक्षक ओरड करतात. तसेच समिती फक्त हिंदू धर्माच्या अंधश्रध्दांवरच बोलते.  अन्य धर्मियांच्या अंधश्रध्दांबद्दल बोलत नाही.  याकरिता समितीला पैसे पुरविले जातात.  असाही आरोप केला जातो.  पण आम्ही वेळोवेळी  आमच्या कार्याने दाखवून दिले आहे की, समितीचा कोणत्याही धर्माला विरोध नाही.  फक्त धर्माच्या नावाखाली रुढ करण्यात आलेल्या अनिष्ठ प्रथांना चळवळीचा विरोध आहे.

**श्री. अनिल वेल्हाळ,**
**सरलेखनिक तथा समितीचे सक्रीय कार्यकर्ते**

## माहे मे, २००९ सेवापूर्ती समारंभ

दि.३०/५/०९ रोजी छत्रपती शिवाजी सभागृह येथे मे, ०९ मधील सेवानिवृत्त अधिकारी/सेवकांसाठी सेवापूर्ती समारंभ आयोजित केला होता.



यामध्ये ७६ वयोपरत्वे व ६ ऐच्छिक सेवानिवृत्तांचा सत्कार करण्यात आला. समारंभासाठी मा.नंदकिशोर जगताप, सल्लागार (कामगार), श्री.तुकाराम जगताप, अध्यक्ष, पुणे मनपा एम्प्लॉईज युनियन, श्री.वसंत गोडबोले, सरचिटणीस, पुणे मनपा सेवानिवृत्त संघ उपस्थित होते. सुरुवातीस सेवानिवृत्त होणारे श्री. दिलीप कृष्णाजी पिंगळे, ज्यु.लिगल अॅडव्हायजर व श्री.जगदिश चव्हाण, सहाय्यक अभियंता यांचे पुष्पगुच्छ देवून मा.नंदकिशोर जगताप यांनी स्वागत केले. प्रास्ताविकात मा.नंदकिशोर जगताप, यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सेवापूर्ती समारंभ आयोजित करण्यामागची भूमिका विषद केली. सत्कारास उत्तर देताना श्री. पिंगळे व श्री. परदेशी यांनी महापालिकेचे आभार मानले. या कार्यक्रमामध्ये सर्व सेवानिवृत्त सेवकांना स्मृतिचिन्ह, शॉल व गुलाबपुष्प देवून गौरविण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कामगार कल्याणाधिकारी श्री. अरुण खिलारी यांनी व आभार प्रदर्शन श्री. जयवंत शिंदे यांनी केले.

## कर्वेरोड क्षेत्रीय कार्यालयातर्फे घन कचरा व्यवस्थापन कार्यशाळा

कर्वेरोड क्षेत्रीय कार्यालयातर्फे दि.१२/६/०९ रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, कोथरुड येथे स १० ते दु. १२ या वेळेत घन कचरा व्यवस्थापनाबाबत कार्यशाळा आयोजित केली होती. कार्यशाळेचे उद्घाटन कर्वेरोड क्षेत्रीय कार्यालयाचे प्रभाग समिती अध्यक्ष मा. शंकर केमसे यांच्या हस्ते संत गाडगे महाराज पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन व दीप प्रज्वलनाने करणेत आले.

कार्यशाळेमध्ये घनकचरा व्यवस्थापनाबाबत जेष्ठ पत्रकार श्रीमती नीला शर्मा यांनी नागरिकांना मार्गदर्शन केले. पुणे मनपा कामगार युनियनच्या सरचिटणीस, श्रीमती मुक्ता मनोहर यांनी मार्गदर्शनामध्ये पुणे शहरामध्ये निर्माण होणारा कचरा, त्याची विल्हेवाट, कामगारांचा सहभाग, इ.च्या अनुषंगाने उपस्थितांना माहिती दिली. श्रीमती अंजली लेले, वनस्पती शास्त्रज्ञ यांनी नागरिकांना ओला कचरा स्वत:चे मोकळ्या जागेत शास्त्रीय पध्दतीने कसा जिरवावा, याबाबत लघुफिल्मद्वारे मार्गदर्शन केले. नगरसेवक मा. किशोर शिंदे, मा. राजाभाउ गोरडे यांनी मनोगत व्यक्त केले. श्रीमती प्राजक्ता अनंतपुरे, गांडुळखत, कंपोस्टिंग तज्ञ यांनी ओला कचरा बागेत, गच्चीत, टेरेसच्या मोकळ्या जागेत कसा जिरवावा, कचऱ्यापासून भाजीपाल्यांची निर्मिती कशी करावी याबाबत छोटी फिल्म दाखवून मार्गदर्शन केले.

नागरिकांनी विचारलेल्या शंकांना मा. विजय दहिभाते, उपायुक्त (वि.का.क्र.१) यांनी मुद्देसूद उत्तरे दिली. कचरा वर्गिकरण व या गंभीर समस्येवर मार्ग



काढणेसाठी पुणेकर नागरिकांचा सहभाग महापालिकेस असणे अतिशय आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. मनपातर्फे कचऱ्याच्या प्रश्नाबाबत भविष्यातील प्रकल्पांची माहिती दिली. ओला सुका कचरा वेगळा करुन देवून नागरिकांनी पुणे मनपास सहकार्य करण्याचे आवाहन केले. या प्रश्नी पुणेकर नागरिक महापालिकेस मदत करतील, असा आशावाद त्यांनी आपल्या मार्गदर्शनामध्ये केला.

कर्वेरोड प्रभाग समिती अध्यक्ष, मा. शंकर केमसे यांनी अध्यक्षीय भाषण केले. मा.श्रीधर आखाडे, क्षेत्रीय वैद्यकीय अधिकारी यांनी आभार मानले. श्री. चंद्रकांत भोसले, विभागीय आरोग्य निरीक्षक यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

कार्यक्रमास नगरसेवक मा. दिपक मानकर, मा. अॅड. किशोर शिंदे, मा. राजाभाउ गोरडे, मा. पृथ्वीराज सुतार, मा. सुरेखाताई पानसरे आणि नॅशनल सोसायटी क्लिन सिटीचे सदस्य विनोद बोधनकर उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि यशस्वी आयोजन मा.नितीन उदास, क्षेत्रीय अधिकारी यांनी केले.

## कामगार दिंडीचे आयोजन

श्री. संत ज्ञानेश्वर महाराज व श्री. संत तुकाराम महाराज यांच्या पालखी आगमनाच्या अनुषंगाने पुणे महापालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांच्या दिनांक १७/६/२००९ रोजी मा.




नंदकिशोर जगताप, सल्लागार (कामगार) यांच्या नेतृत्वाखाली कामगार दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. या दिंडीमध्ये सुमारे १५०-२०० अधिकारी/कर्मचारी सहभागी झाले होते. दिनांक १७/६/२००९ रोजी सकाळी ५.३० वाजता मनपा भवन येथून वाहनाने आळंदी रोड, साईबाबा मंदीर येथे पोचलेल्या कामगार दिंडीचा तेथून श्री. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यात सहभागी होवून मार्गक्रमण करत सायंकाळी ६.०० वाजता मनपा भवन येथे समारोप झाला. सदर कामगार दिंडी प्रबोधन दिंडी होती. पाणी व पर्यावरण संरक्षण व संवर्धन, शहराचे आणि वैयक्तिक आरोग्य, महानगरपालिकेतील विविध कर संकलन, सार्वजनिक स्वच्छता, कचरा वर्गिकरणाचे महत्व, इत्यादीच्या अनुषंगाने पुणेकर नागरिक तसेच संपूर्ण महाराष्ट्रातून वारीत सहभागी वारकरी यांचे प्रबोधन करण्याचा मुख्य हेतू या दिंडीमागे आहे.

वरील सर्व बाबींच्या अनुषंगाने प्रबोधनपर फलकाद्वारे सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांनी वारकरी, नागरिक आणि पुणेकर यांचे प्रबोधन केले. तसेच, पुणे मनपा कामगार युनियनचे कलापथकही या कामगार दिंडीमध्ये उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते. या कलापथकामध्ये वादक, गायक, इत्यादी कलावंतांनी आपापल्या कलेद्वारे प्रबोधनपर कार्यक्रम सादर केले. यामध्ये भक्तीसंगित, पोवाडे, इतर रचना यांचा समावेश होता. कळस येथे मा. महापौर, पुणे यांनी या कामगार दिंडीचे स्वागत करुन या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक केले. तसेच, आळंदी मार्गावरुन मार्गक्रमण करत असताना महानगरपालिकेच्या या कामगार दिंडीचे अनेक नागरिक, स्वयंसेवी संघटना, प्रसार माध्यमे, इत्यादींनी विशेष नोंद घेवून या आगळयावेगळ्या उपक्रमास दाद दिली.त्याचप्रमाणे कमलनयन बजाज, पुणे मुंबई रस्ता येथे महापालिकेच्या वतीने मा. अध्यक्ष, स्थायी समिती यांनी या कामगार दिंडीचे स्वागत व कौतुक केले.

कामगार दिंडीमध्ये सहभागी झालेल्या सर्व सभासदांसाठी कामगार युनियनचे पदाधिकारी श्री. मधुकर नरसिंगे व श्री. पठारे यांनी सकाळी नाश्त्याची व्यवस्था केली. कोठी अधिकारी श्रीमती भारती यांनी न्याहारीची व्यवस्था केली. राम सोसायटी येथे सर्वश्री ढगे, काथवटे, सिंदगी व घारे यांनी दुपारच्या जेवणाची विशेष व्यवस्था केली. शेवटी मनपा भवन येथे कामगार दिंडीचा समारोप झाला. या वेळी या कामगार दिंडीतील सहभागी सभासदांनी सुगम भावगिते आणि भक्तीसंगित म्हणून उपस्थितांची मने जिंकली. या कामगार दिंडीचे आयोजनामध्ये सल्लागार (कामगार) कार्यालयातील ज्यु.ग्रे.लेखनिक श्री. अशोक ढगे यांनी विशेष परिश्रम घेतले. या दिंडीच्या यशस्वी आयोजनामध्ये विशेष परिश्रम घेतलेल्या सहकार्य करणाऱ्या सर्वांचे कामगार कल्याण निधीमार्फत हार्दिक आभार.

## पुणे महानगरपालिकेत पर्यावरण दिन साजरा

पुणे महापालिकेतर्फे दिनांक ५ जून, २००९ रोजी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त विविध ठिकाणी वृक्षारोपण कार्यक्रमाद्वारे साजरा करण्यात आला. यामध्ये तळजाई टेकडी येथील क्षेत्रावर वृक्ष प्राधिकरण पुणे मनपा व निसर्ग सेवक संस्था, पुणे यांचे संयुक्त विद्यमाने सकाळी ७.३० वाजता वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला. या वृक्षारोपण कार्यक्रमामध्ये स्थानिक प्रजातीची १०० रोपे लावण्यात आली. प्रामुख्याने वड, पिंपळ, निम, करंज, जांभुळ, मोहगणी, सातवीण, अर्जुन, इत्यादी प्रजातींची लागवड करण्यात आली. सदर कार्यक्रमास वृक्ष प्राधिकरणाचे सदस्य मा. डॉ. सौ. सुनिता मोरे व निसर्ग सेवक संस्थेचे पदाधिकारी तसेच पुणे मनपाचे अधिकारी व सेवक वर्ग उपस्थित होते.

तदनंतर कर्वेरोड लगत ४५, निरवाणा हिल येथे फ्लाय ओव्हर शेजारी मे. कुमार बिल्डर्स यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमास मा. उप आयुक्त, उद्यान विभाग व वृक्ष अधिकारी, पुणे मनपा उपस्थित होते. सदर कार्यक्रमात मे. कुमार बिल्डर्स यांनी पर्यावरण दिनानिमित्तचे औचित्य साधून पुणे मनपास ५ हजार व पुणे कॅन्टोंमेंट बोर्ड यांस १ हजार स्थानिक प्रजातींची रोपे भेट म्हणून दिली. सदर कार्यक्रमास वनराई संस्थेचे अध्यक्ष श्री. मोहन धारिया, सामाजिक वनीकरण विभागाचे संचालक श्री. प्रकाश ठोसरे वृक्ष प्राधिकरण विभाग पुणे मनपाचे सदस्य डॉ. सौ. सुनिता मोरे, श्री. गजानन थरकुडे, श्री. परदेशी इ. उपस्थित होते. याचबरोबर मनपाच्या उद्यान विभागाचे प्रमुख उप आयुक्त श्री. भानुदास माने, वृक्ष प्राधिकरण विभागाचे वृक्ष अधिकारी श्री. बाळासाहेब जगजाप उपस्थित होते.

पर्यावरण दिनानिमित्त पुणे नगर रस्त्यावरील रामवाडी जकात नाक्याजवळ महापालिकेचे वृक्ष प्राधिकारी आणि जयहिंद पर्यावरण संघटना, रामवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यामध्ये १०० स्थानिक प्रजातींच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने वड, पिंपळ, निम, चाफा, इत्यादी रोपांची लागवड करण्यात आली. तसेच, चंदननगर येथील महाराणा प्रताप पोलिस चौकीमागे बिडी कामगार वसाहत येथे महापालिकेचे मा. आयुक्त श्री. महेश झगडे, श्री. प्रशांत वाघमारे, नगर अभियंता, श्री. विवेक खरवडकर, अतिरिक्त नगर अभियंता, स्थानिक नगरसेवक मा. बापू पठारे, वृक्ष प्राधिकरण समितीचे सदस्य श्री. खरात, उद्यान अधिक्षक व पथ विभागाकडील अभियंते यांच्या उपस्थितीत रस्त्याच्या दुतर्फा स्थानिक प्रजातींच्या वृक्षांची लागवड करण्यात आली.

## प्रामाणिक

मी दत्तात्रय सुदामराव चव्हाण पुणे महानगरपालिकेत संगणक विभागात कार्यरत आहे. दिनांक १०/६/२००९ रोजी मी स्वच्छतागृहात गेलो असता, माझे पैशाचे पाकिट पडले. त्याची जाणीव मला ५ तासांनी झाली. मी तर त्या पाकिटाची परत मिळण्याची शक्यताच सोडून दिली होती. परंतु आपल्याच मनपातील श्री. जालिंदर ज्ञानेश्वर खवले, बिगारी, सेवकवर्ग विभाग यांना ते पाकिट सुदैवाने सापडले. त्यांनी माझा शोध घेवून मला ते दिनांक ११/६/२००९ रोजी मा. सल्लागार (कामगार) यांचेसमक्ष सुपूर्त केले. मी दिलेले बक्षिसही त्यांनी सविनय नाकारले.

मला त्यांच्या निस्पृह प्रामाणिकपणाचा व धडपडीचा आदर वाटतो.

## बायोगॅस व घनकचरा व्यवस्थापन कार्यशाळा संपन्न

पुणे शहरामधील कचऱ्याच्या प्रश्नाबाबत जागृती व कचऱ्यापासून संपत्ती निर्माण करणेकामी करावयाच्या विविध उपाययोजनांचा एक भाग म्हणून ॲम्बेसी ऑफ स्विडन यांचे वतीने हॉटेल ताज ब्लु



डायमंड येथे बायोगॅस व घन कचरा व्यवस्थापन नियोजन व उर्जा संदर्भात कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यशाळेचे उद्घाटन मा.महापौर सौ. राजलक्ष्मी भोसले यांनी केले. या प्रसंगी स्विडेनचे ॲम्बॅसिडर एच.ई.लार्स. ओल ओफ लिंडग्रेन, स्विडिश एनर्जीचे प्रतिनिधी जेनीकाटो, स्विडेन एजन्सीचे उपाध्यक्ष श्री. रोल्फ रिसिंग व सिनियर ॲडव्हायजर एस.आर.वेंगटेशन, भारत फोर्ज कंपनीचे चेअरमन श्री. बाबा कल्याणी, ए.आर.ए.आय.चे संचालक श्री. मराठे उपस्थित होते. स्विडनमधील बायोगॅस, घन कचरा, उर्जा, पर्यावरण क्षेत्रातील कंपन्यांचे प्रतिनिधी तसेच पुणे मनपा स्थायी समितीअध्यक्ष मा. निलेश निकम, मा.विकास मठकरी, मा. शाम देशपांडे, पर्यावरण विभागाचे श्री. मंगेश दिघे, ग्रीन लिफचे संचालक श्री.निवास कसुल्ला, ॲटोमोटिव्ह रिसर्चचे उपसंचालक श्री.डी.जे.कुलकर्णी, श्रीमती गीता वीर, व्हि.आर.डी.ई.चे अजय गुप्ता, अजय ओझा. अर्बन इन्फ्रास्ट्रक्चरचे दिनेश रामनाथन, मुंबई मनपाचे श्री.पी.एस. आवटे, श्री. जयसन पॉल, थर्मेक्स कंपनीचे श्री. सुरेंद्र पटवर्धन, विविध कंपन्यांचे वरिष्ठ प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रसंगी स्वागतपर भाषण करताना श्री.एच.ई.लार्स ओल ओफ लिंडग्रेन यांनी सांगितले की, उर्जा व बायोगॅस संदर्भातील प्रश्न व समस्या स्विडन व भारतातील सारख्याच आहेत. या क्षेत्रातील समस्यांचे निराकरण होण्यासाठी स्विडनमधील विविध कंपन्यांनी बऱ्याच वर्षापासून तंत्रज्ञान वापरुन समस्यांचे निराकरण करण्याचे प्रयत्न केले आहेत. याबाबत स्विडनमधील अनुभव क्षेत्रही मोठे आहे. त्यामुळे बायोगॅस निर्मितीतून उर्जा व इंधनाचा मोठ्या प्रमाणावर वापर करण्यात येत आहे. पुणे शहरातील उर्जा व बायोगॅस क्षेत्रात एकत्रित काम करण्यास आम्हास आनंदच होईल, असे त्यांनी सांगितले. श्री. बाबा कल्याणी यांनी सांगितले की, पुणे शहराच्या विकासाच्या दृष्टीने बायोगॅस व घन कचरा व्यवस्थापनासंदर्भात स्थानिक प्रशासनाने पायाभूत सुविधा व जमिनीची उपलब्धतता करुन दिल्यास स्विडन कंपन्यांच्या सहकार्याने भारत फोर्ज कंपनीला या क्षेत्रात काम करण्यास आनंद होईल.

या प्रसंगी विविध खाजगी कंपन्यांच्या वतीने संगणकीय सादरीकरण करण्यात आले. यामध्ये कचऱ्यावर प्रक्रिया करणारे विविध प्रकल्प, सद्यस्थिती, भविष्यकालीन नियोजन, त्यांची यशस्वीता, येणाऱ्या अडचणी, उपाययोजना, इत्यादींच्या अनुषंगाने चर्चा करण्यात आली.

## मनोरुग्णालय व महिला कारागृह, येरवडा येथे योग प्राणायाम शिबीराचे आयोजन

प्रादेशिक मनोरुग्णालय व महिला कारागृह, येरवडा येथे श्री देविदास बापूराव बनकर व सौ.शैलजा देविदास बनकर, प्रमुख



योग शिक्षक, हरिद्वार यांनी मनोरुग्ण व कैद्यांना योग प्राणायामाचे प्रशिक्षण दिले. या शिबीरास मोठ्या संख्येने महिला कैदी व मनोरुग्ण उपस्थित होते. शिबीरामध्ये योगासने, प्राणायाम, ॲक्युप्रेशर, सकारात्मक विचार, घरगुती औषधे, आहार विहार, आरोग्य याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. संवेदनशिलता, वक्तशिरपणा, श्रमप्रतिष्ठा, सर्व धर्म समभाव, सहिष्णुता, सौजन्यशिलता, राष्ट्रप्रेम, राष्ट्रभक्ती ही मुल्ये मनावर ठसविली गेली. आपण भगतसिंग, राजगुरु, सुखदेव बनू शकलो नाही तरी तसे बनण्याचा प्रयत्न केला पाहिजे, यश अपयशाने न खचता योग्य मार्गाचा अवलंब करावा, सहवासाचा परिणाम फारच महत्वाचा असतो, योग्य विचार करुन जगा यासारखे प्रबोधनपर विचार सांगितले.

देशभक्तीपर गिते व अध्यात्मिक भजने यातून त्यांच्या डोळ्यातील अश्रूंना आवरणे कठिण झाले. महिला कारागृहात प्राणायाम वर्गात २५ महिला कैदी योगशिक्षिका बनवण्यातआल्या. दि. ३०/५/०९ रोजी तुरुंग अधिकारी वाघ व शिकोरे मॅडम यांच्या हस्ते योगाची पुस्तके व गुलाब पुष्प यांचे वाटप करण्यात आले व तुळशीची २५ रोपे देण्यात आली.

तसेच, मनोरुग्णालयामध्ये समारोपाचे दिवशी अधिक्षक डॉ. यादव, डॉ. सावंत व डॉ. तपासे यांच्या हस्ते श्री. व सौ बनकर यांचेकडून मनोरुग्णांना गुलाबपुष्प देण्यात आले. शेवटचे दिवशी बनकर परिवारातर्फे रुग्णांना मिष्टान्न देण्यात आले व वंदेमातरम घेवून वर्गाची सांगता झाली. प्रमुख योगशिक्षक या नात्याने व श्रध्देय स्वामीजींचे कार्य अखंड पुढे चालू ठेवण्याचे व्रत घेवून व सामाजिक बांधिलकी म्हणूनही या कार्याला वाहून घेतलेले श्री.व सौ. बनकर यांच्या कार्यास हार्दिक शुभेच्छा.


**कल्याणवार्ता**

**जून, २००९**

❖ **प्रकाशक तथा अध्यक्ष** ❖

**कामगार कल्याण निधी**

**मा. महेश झगडे**

आयुक्त, पुणे महापालिका

❖ **संपादक** ❖

मा. नंदकिशोर जगताप

सल्लागार (कामगार)

❖ **कार्यकारी संपादक** ❖

शिवाजी दौंडकर

कामगार कल्याण अधिकारी

❖ **सहाय्यक** ❖

सौ. ज्योती अ.भोसले

❖ **मुद्रक** ❖

जयंत पवार

व्यवस्थापक,

मुद्रणमहर्षि मामाराव दाते

मुद्रणालय, मनपा, पुणे.

❖ **प्रकाशन स्थळ** ❖

पुणे महापालिका

शिवाजीनगर, पुणे ४११ ००५

या अंकात प्रसिध्द झालेल्या मतांशी प्रकाशक, संपादक, कार्यकारी संपादक व पुणे महापालिका सहमत असतीलच असे नाही.

❖ **संपर्क** ❖

सल्लागार (कामगार) कार्यालय,

पुणे महानगरपालिका.

दूरध्वनी क्र. २५५० १२५५/१२५२/१२५३

ईमेल आयडी

nandkumar.jagtap@punecorporation.org


## व्यक्तिमत्व विकास शिबीर - प्रशिक्षणार्थी मनोगत

विद्येचे माहेरघर असणाऱ्या पुण्यनगरीच्या महानगरपालिकेतील सल्लागार (कामगार), मा.नंदकिशोर जगताप सर व कामगार कल्याणाधिकारी, मा. अरुण खिलारी सर यांनी दिनांक २ ते २२ जून, २००९ या कालावधीत व्यक्तिमत्व विकासाकरिता घेतलेले शिबीर अनेकांच्या जीवन विकासाला गती देणारे ठरले आहे.

"Social Transformation through dynamic education" हेच उज्वल जीवनाचे रहस्य आहे. एडवी सर यांनी व्यक्तीची वाढ व व्यक्तीचा विकास या दोन्ही संकल्पना जरी पूर्ण वेगळ्या असल्या तरी परस्परांना त्या पूरक आहेत. व्यक्ती केंद्रभूत मानून तिच्या विकासासाठी केलेले योग्य प्रयत्न व्यक्ती विकासाला म्हणजेच व्यक्तिमत्व घडविण्यासाठी उपयोगी ठरतात.

आज सारं जग जागतिक मंदीच्या भस्मासुराने व अनेक नैसर्गिक आपत्तीने घायाळ झालेल्या जगाला अतिरकी संघटनेने नेस्तनाबूत करत दुःखाच्या व वेदनेच्या महासागरात ढकलले जात आहे. परस्परांना दोषी ठरवून आपण मात्र निर्दोष असे देखील भासवले जात आहे. मात्र शांतपणे विचार केल्यास यास जबाबदार आपणच आहोत.

मुद्दाम योग्य प्रकारे केलेले योग्य प्रयत्न व्यक्ती विकासास पूरक ठरतात व त्यातून आदर्श व्यक्तिमत्व व विकसित व्यक्ति घडत जातात. अशाच व्यक्ती समाजात उपकारक ठरतात. ॲरिस्टोटलने म्हटले आहे "A man is a social animal"

व्यक्तिमत्व विकासाची गरज सांगताना मा. जगताप सरांनी मनुष्याच्या मानसिकतेचे व आदर्श ध्येयवादी बनण्याचे केलेले विश्लेषण परिणामकारक झाले. त्याचप्रमाणे मा. एडवी सरांनी देशाच्या विकासात आदर्श नागरिकाचाच वाटा बहुमोल आहे, हे अनेक उदाहरणांवरुन पटवून दिले. व्यक्तिमत्व विकास ही संकल्पना मुळी बहुस्पर्शी आहे. व्यक्तिमत्व विकासात शिस्त व अनुशासन त्याचे महत्व किती असाधारण आहे हे मा. रामटेके सरांनी विशद केले. त्याचप्रमाणे आपण जन्म कोणाच्या पोटी घ्यावा हे जसे आपल्या हातात नाही पण आपण कसे चांगले बनावे हे मात्र आपल्या हातात आहे, ही गोष्ट अतिशय कळकळीने मा. पी.पी .जोशी साहेब व डांगी साहेब, झोन डायरेक्टर यांनी पटवून दिली व यासाठीच अशी शिबीरे होत राहणे गरजेचे आहे. व्यक्तिमत्व विकासाला अध्यात्म्याची झालर, नैतिकतेचा झगा व सद्गुणांचा, आदर्श पोषाख असावा.

शिक्षणाने माणसं शिक्षित होतात पण सुसंस्कृत होतातच असे नाही, हे रामटेके सरांनी पटवून दिले. जसा व्यक्तिचा संपूर्ण विकास महत्वाचा तसेच त्याचे परिवर्तन ही आपली सर्वोच्च बांधिलकी आहे. यासाठी आर्थिक विकासाचे फार मोठे आव्हान आपण पेलत असताना उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण याचा तारतम्याने विचार करुन विकासाची पाउले उचलली पाहिजे. देशातील कामगार त्यांचे शिक्षण व क्षमता याबाबत उदार दृष्टिकोन ठेवून योग्य कार्यनितीचा अंतर्भाव करुन देशाची उत्पादकता वाढविणे हीच काळाची गरज ध्यानात धरुन विकासाकडे वाटचाल व्हावी, याकरिता सकारात्मक दृष्टिकोन व योग्य, चांगल्या नेतृत्वाची गरज आहे.

थोडक्यात व्यक्तिमत्व विकासाच्या उद्घाटन शिबीराच्या पहिल्या दिवशी असलेली आमच्या सर्वांची संकुचित मानसिकता बदलून गेली आहे. कारण मा.गोडबोले सरांनी संपूर्ण शिबीरातील शिस्त, नियमितता, जिव्हाळा, मार्गदर्शकांची विशेष अभ्यासपूर्ण दिलेली ज्ञानाची शिदोरी आम्हा सर्वांच्या अंतःकरणाला भारुन टाकणारी ठरली. मने हेलावून सोडणारी ठरली आणि म्हणूनच मी एकटी नाही पण आम्ही सर्व शिबीरार्थी व्यक्तिमत्व विकासाने नवीनपणाने घडलो गेलो. आम्ही सर्व शिबीरार्थी आमच्या महानगरपालिकेस, मा. जगताप सर, मा. खिलारी सर, शिक्षण व आरोग्य विभागास व सर्व संयोजकांस विनयपूर्वक आभार देवू इच्छितो.

मा. गोडबोले सर यांनी शिकविल्याप्रमाणे आमच्यामध्ये बदल घडलेला आहे. त्याचे परिवर्तन मी माझ्या कुटुंबात, शेजाऱ्यात व माझ्या कार्यक्षेत्रात बिंबविण्याचा निश्चित प्रयत्न करीन, याची मी खात्री देते. कारण कायझन - इच्छा बदलाव याने सतत सुधार दर्शाता है. कायझन व्यक्तिगत, पारिवारिक, सामाजिक और कार्यजीवन सभी मे लागू है. कायझन संकल्पनेमुळे तर आम्ही इतके भारावून गेलो की कवी सूरदासजी की पंक्तिया मुझे याद देती है -

तू ऐसी करणी कर, की कोई न कहे फूट.
तू ऐसी बोली बोलीए, की कोई न कहे झूट.ऐसी जगह बैठ, की कोई न कहे उठ.

**सौ.तेजस्विनी राजेंद्र चव्हाण-काळे,**
**परिचारिका, कमला नेहरु हॉस्पिटल**

## गुणवंतांचा सत्कार

पुणे महानगरपालिका अधिकारी/सेवकांच्या पाल्यांनी माध्यमिक आणि उच्च माध्यमिक (इयत्ता दहावी आणि बारावी) परीक्षांमध्ये उत्तुंग यश प्राप्त केले आहे. **उत्तीर्ण सर्व पाल्यांचे कामगार कल्याण निधीमार्फत हार्दिक अभिनंदन व त्यांच्या भावी कारकिर्दीच्या वाटचालीस शुभेच्छा.**

माध्यमिक व उच्च माध्यमिक (दहावी व बारावी) परीक्षांमध्ये ७५% पेक्षा जास्त गुण प्राप्त झालेल्या सर्व पाल्यांचा कामगार कल्याण निधीमार्फत गुणगौरव व सत्कार करण्यात येणार आहे. त्यासाठी संबंधित सभासद सेवकांनी आपल्या माहे एप्रिल पेड इन मे, २००९ या महिन्याच्या वेतनचिठ्ठी व पाल्याच्या गुणपत्रिकेच्या झेरॉक्स प्रती साक्षांकित करुन मा. खातेप्रमुख यांचेमार्फत आपले अर्ज सल्लागार (कामगार) कार्यालयाकडे दिनांक १०/७/२००९ पर्यंत सादर करावेत. उशिरा आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

**अर्ज करण्याची अंतिम तारीख १०/७/२००९.**